वि.दि.दावा क्र.८१/२०२३
नत्थु वि. महा. शासन
निशाणी क्र. १७

उलट तपास प्रतिवादी क्र. १ व २ तर्फे -
प्रतिवादी व त्यांचे वकील गैरहजर - सबब उलटतपास नाही.
उलटतपास प्रतिवादी क्र. ३ तर्फे विद्वान विधीज्ञ श्री. देवळे यांच्यातर्फे शपथेवर पुढे सुरु

१५. हे म्हणणे खरे आहे की दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी क्र.३ चा गोठा असुन, दावा मिळकतीवर प्रतिवादी क्र.३ चा ताबा आहे व त्याचा कब्जा मिळण्याकरीता मी दावा दाखल केला आहे. माझे शिक्षण बि.कॉम पर्यंत आहे. माझे शपथपत्र अडव्होकेटे पुंडे यांनी बनविले होते. त्या शपथपत्रामध्ये काय लिहिले आहे याची माहिती मला आहे, माझ्या वकीलांनी मला समजावुन सांगितले होते. माझ्या शपथपत्रातील परिच्छेद सहा मध्ये काय मजकुर लिहिला आहे हे मी सांगु शकत नाही. ज्यावेळेस मी शपथपत्र बनविण्यासाठी गेलो त्यावेळी वकीलांनी शपथपत्र बनवुन ठेवले होते. त्यावर सही केली आणि सादर केले. मी १९८० सालापासुन नागपुर येथे राहतो. माझ्याकडे होमियोपॅथीची डीग्री आहे. माझ्याजवळ पटना विद्यापिठाची डीग्री आहे. माझा वैद्यकिय व्यवसाय होता. मी मागिल आठ वर्षापासुन बंद केला आहे. माझ वडील १९८८ साली मयत झाले. माझे वडील मांगली तेली या गावी राहत होते आणि तेथेच मयत झाली. वडीलांची गावामध्ये घर आणि जागा होती. वादी क्र.२ मधुकर हा माझा सख्खा भाउ आहे आणि तो मांगलीतेली येथे राहुन तो शेती करतो. माझी व माझ्या भावाची शेती वेग-वेगळी आहे. माझ्या व मधुकर यामध्ये १३ वर्षापुर्वी वाटणी झाली. हे म्हणणे खरे आहे की मी नागपुर येथे व्यवसाय करत असतांना माझा भाउ माझी शेती पाहत होता. हे म्हणणे खरे नाही की माझ्या वडीलांना घर आणि जागा असल्यामुळे दुस-या घराची अथवा जागेची आवश्यकता नव्हती. हे म्हणणे खरे नाही की माझ्या वडीलांनी तहसिलदार यांच्याकडे जागेकरीता अर्ज केला नव्हता. माझ्याजवळ वडीलांनी केलेल्या अर्जाची नक्कल उपलब्ध नाही. हे म्हणणे खरे नाही की माझ्या वडीलांना तहसिलदार यांनी प्लॉट नं.३४ वाटप केले नव्हते. मी माझ्या वडीलांना प्लॉट मिळाला आहे म्हणुण पटटा आणि चलान सादर केले आहेत.

१६. हे म्हणणे खरे आहे की माझ्या वडीलांना मिळालेला प्लॉट हा सर्वे नं. २९/१ मधला आहे. हे म्हणणे खरे नाही की नि.३८ हे प्लॉट वाटपाचे नाही. साक्षीदाराला नि.३८ दाखविण्यात आले आणि विचारण्यात आले की, त्यावर प्लॉट वाटपाचे रजिष्टर आहे असे नमुद आहे का? साक्षीदाराने सांगितले की त्यावर आरक्षित भु-खंडाचे रजिष्टर आहे असे नमुद आहे. आता साक्षीदाराला नि.३७ दाखविण्यात आले आणि विचारण्यात आले की, सदर प्रमाणपत्र हे सर्वे नं. २९/१ बद्दल आहे का? साक्षीदाराने सांगितले की सदर प्रमाणपत्रामध्ये सर्वे नं. २९/१ चा उल्लेख नाही. तसेच साक्षीदाराला

नि.३८ दाखविण्यात आले. साक्षीदाराने सांगितले की सदर नि.३८ मध्ये सर्वे नं.२९/१ चा उल्लेख नाही. हे म्हणणे खरे आहे की आरक्षीत भुखंड म्हणुन एखादया विशिष्ट कामासाठी राखुन ठेवलेला भुखंड आहे. नि.३७ व ३८ सोबत प्लॉटचा अथवा ले-आउटचा नकाशा नाही. हे म्हणणे खरे आहे की नि.३७ व ३८ मध्ये प्लॉटची चतुर्सिमा नमुद नाही. हे म्हणणे खरे आहे की नि.३८ मध्ये संबंधीत प्लॉट हा संबंधीत व्यक्तीला देण्यात आला असा स्पष्ट उल्लेख नाही. साक्षीदाराला नि.३९ दाखविण्यात आले. साक्षीदाराने सांगितले की नि.३९ वर कोणत्या वर्षी चालान भरण्यात आले याचा उल्लेख नाही. हे म्हणणे खरे आहे की नि.३७ मध्ये केस नंबरचा उल्लेख नाही. मुळ वाटप रजिष्टरची प्रमाणित प्रत मी दाखल केली नाही. हे म्हणणे खरे आहे की प्रथम प्लॉट दिल्या जातो त्यानंतर ताबा मिळतो आणि सर्व कामे ही सरकार तर्फे केली जाते. माझ्या म्हणण्याप्रमाणे दिनांक १७/०२/१९८७ सालापासनु प्लॉट हा माझ्या वडीलांच्या मालकीचा झाला. हे म्हणणे खरे आहे की सर्वे नं. २९/१ हा पुर्वी भदुजी साठवणे यांच्या नावाने होता. भदुजी म्हणजे प्रतिवादी क्र.३ चे वडील. सर्वे नं. २९/१ मध्ये भदुजी यांचा जनावरांचा गोठा होता. हे म्हणणे खरे आहे की आज रोजी देखिल प्रतिवादी क्र.३ यांचा जनावरांचा गोठा तेथेच आहे. माझ्या म्हणण्याप्रमाणे, प्रतिवादी क्र.३ चा जनावराचा गोठा हा प्लॉट नं. ३४ आहे आणि तो मला मिळाला पाहिजे. हे म्हणणे खरे आहे की सर्वे न.२९/१ ची जमिन सरकारने १९७९-८० साली संपादीत केली. माझे असे म्हणणे आहे की जमिन संपादित झाल्यानंतर, त्याचे वाटप मला झाले. माझ्या वडीलांना प्लॉट अलॉट झाला असा तहसिलदार यांचा आदेश माझ्याकडे नाही. कोणत्या तारखेला अलॉटमेंट झाले याचा पुरावा म्हणजे नि.३७ व ३८ आहे. कोणत्या तारखेला अलॉटमेंट झाले याचा उल्लेख दाव्यामध्ये नाही आणि तो का नाही याचे कारण मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की तहसिलदारचा कोणताही आदेश नसल्यामुळे, अलॉटमेंटचा कागद हजर केला नाही. हे म्हणणे खरे आहे की माझ्या वडीलांना ताबा मिळाला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की ताब्याकरीता मी कार्यवाही केली परंतु अजुन पर्यंत मला ताबा मिळाला नाही. माझ्या नावाने प्लॉट व्हावा म्हणुन मी मागच्या वर्षी कार्यवाही केली. त्याचे कागदपत्र मी हजर केले नाही. माझ्या म्हणण्याप्रमाणे माझे वडील १९८७ साला पासुन प्लॉटचे मालक झाले. सरकारने प्रतिवादी क्र.३ च्या गोठयाची जागा, संपादित झाल्यानंतर देखिल ताब्यात घेतली नाही. सरकारने गोठयाची जागा आणि प्लॉट नं. ३५ चा ताबा घेतला नाही. गोठयाची जागा म्हणुन प्लॉट नं. ३४ आहे. प्लॉट नं. ३४ चा ताबा मिळावा म्हणुन सन १९९१ साली तहसिलदार यांच्याकडे अर्ज केला होता. हे म्हणणे खरे आहे की सगळयात पहिल्यांदा मी २००० मध्ये तहसिलदार यांच्याकडे, प्लॉट मिळावा

म्हणुन अर्ज केला होता. मी प्रतिवादी क्र. ३ कडे प्लॉट देण्याबाबतची मागणी तोंडी केली होती परंतु प्रतिवादी क्र.३ ने दिले नाही. त्यामध्ये १३-१४ वर्ष निघुन गेले. प्रतिवादी क्र.३चे म्हणणे होते की ते मालक आहेत आणि ते प्लॉट देणार नाही. हे म्हणणे खरे नाही की गोठा आगोदरपासुनच प्लॉट नं. ३४ मध्ये होता आणि याची माहिती मला आणि सरकारला होती. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की गोठा नंतर बांधण्यात आला. मला ताबा मिळाला नाही कारण प्रतिवादी क्र.३ हे तेथे जनावरे बांधत होते. प्रतिवादी क्र.३ने तहसिलदार याला ताबा दिला नाही म्हणुन मला ताबा मिळाला नाही. मी अथवा सरकारने ताबा घेवु नये म्हणुन कोणत्याही न्यायालयाचा मनाई आदेश नव्हता. हे म्हणणे खरे आहे की ताबा मिळाला नसल्याचे मला, अलॉटमेंट झाल्यापासुन माहित आहे. हे म्हणणे खरे आहे की १९८७ पासुन ते २०१८ पर्यंत, प्रतिवादी क्र.३ विरुद्ध प्लॉट नं. ३४ मिळावा म्हणुन कोणतीही कार्यवाही केली नाही. हे म्हणणे खरे नाही की माझे वडील कधीही प्लॉटचे मालक झाले नव्हते व नाही. हे म्हणणे खरे नाही मी देखिल प्लॉटचा मालक झालो नव्हतो वा नाही. हे म्हणणे खरे नाही की सरकारने जागा ही प्रतिवादी क्र.३ लाचा अलॉट करायची होती म्हणुन संपादित केली होती. हे म्हणणे खरे नाही की दावा मिळकतीमध्ये माझा हक्क नाही. हे म्हणणे खरे नाही की दावा मुदतबाहय आहे. हे म्हणणे खरे नाही की नागपुरला राहणे असल्याने, मला शेतीची गरज नाही. हे म्हणणे खरे नाही की त्यामुळे प्लॉटची गरज नाही. हे म्हणणे खरे नाही की खोटा दावा करुन, खोटे शपथपत्र करुन, खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण
फेरतपास नाही.

माझे समक्ष
SARODE SANDEEP MARUTI
H.M.P. No. 16-2024
Digitally signed by SARODE SANDEEP MARUTI
Location: Ramtek
Date: 2024.07.16 11:20:59 +0530

दिनांक ९.०७.२०२४
रामटेक

(एस.एम. सरोदे)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
रामटेक

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file of evidence are same word to word as per original evidence.

Name of Stenographer : R. J. Khobragade (Gr.-II)